# बडोद्याच्या महाराणी चिमणाबाई गायकवाड द्वितीय यांचे स्त्री सुधारणा कार्यातील वैचारिक योगदान

**डॉ . सुनीता संतोष खडसे** सहयोगी प्राध्यापिका व इतिहास विभागप्रमुख श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली

---

**प्रस्तावना :**

भारताचा इतिहास हा प्रामुख्याने राजकीय इतिहास म्हणून ओळखला जात असे. राजकीय इतिहासामध्ये राजे त्यांची युद्ध, तह यावरच अधिक भर दिलेला दिसून येतो. राजकीय इतिहासाला सामाजिकतेची जोड द्यावी असा विचार प्रवाह आधुनिक कालखंडामध्ये उदयास आलेला दिसतो . यादृष्टीने पाहता एक सामाजिक इतिहास घडवणारा राजा म्हणून आपणास बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचे वेगळेपण अधोरेखित करता येते. महाराजांचा सामाजिक दृष्टिकोन, स्त्री शिक्षण विषयक भूमिका व स्त्रियांच्या सुधारनेचे कार्य आणि एकूणच आपल्या संस्थानाला आधुनिक बनवण्यासाठी महाराजांनी केलेल्या सगळयात तरतुदी, कायदे हे महाराजांच्या पुरोगामी राज्यकर्तेपणाचे साक्ष देणारे आहेत. महाराजांनी आपली पत्नी महाराणी चिमणाबाई द्वितीय यांच्या शिक्षणाच्या बाबतीत घेतलेली भूमिका आणि त्यातून उदयास आलेले एक सक्षम स्त्री नेतृत्व म्हणून चिमणाबाई द्वितीय यांच्या कार्याचा आढावा घेताना आपणास अगदी सहज लक्षात येते की, महाराज सयाजीराव गायकवाड हे स्त्री सक्षमीकरणासाठी कार्य करणारे एक कर्ते सुधारक होते . स्त्रियांच्य सुधारनेची सुरुवात महाराजांनी स्वतःच्या घरापासून केली होती हेच महाराजांचे एक वेगळे वैशिष्ट्य होते . त्यांनी आपल्या पत्नीला शिक्षण आणि सामाजिक कार्यात जोडून घेऊन भारतीय भारतीय इतिहासातील पहिली समाजसुधारक महाराणी म्हणून घडविण्याचा प्रयत्न केला. बडोद्याच्या महाराणी चिमणाबाई द्वितीय यांचे कार्य म्हणजेच महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या स्त्रीसुधारणेच्या कार्याचे एक चालते बोलते उदाहरण होते. महाराणी चिमणाबाई गायकवाड द्वितीय यांनी तत्कालीन कालखंडात स्त्री सुधारणेच्या बाबतीत जी वैचारिक भूमिका घेतली होती ती खरोखर क्रांतिकारक अशीच होती . त्यांची हीच वैचारिक भूमिका त्यांनी स्त्रियांच्या सुधारणेसाठी केलेल्या प्रत्यक्ष कामाचा पाया होती. त्या वैचारिक भुमिके विषयी विवेचन सदर शोधनिबंधात केलेले आहे .

**जन्म आणि बालपण :**

महाराणी चिमणाबाई यांचा जन्म सन १८७२ मध्ये झाला. श्रीमंत सरदार बाजीराव अमृतराव घाडगे यांच्या त्या कन्या. विवाहापूर्वीचे त्यांचे नाव श्रीमती गजराबाई देवी असे होते. देवासच्या राजकन्या म्हणून त्यांची जडणघडण झाली होती. गजराबाईंचा विवाह बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्याशी झाल्यानंतर त्या महाराणी चिमणाबाई द्वितीय म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. महाराजांच्या प्रथम पत्नी चिमनाबाई यांचे निधन झाल्यानंतर महाराजांनी देवासच्या राजकन्या गजराबाई घाटगे यांच्याशी विवाह केला होता. तत्कालीन समाजात स्त्रियांच्या दृष्टीने असलेले अतिशय बंदिस्त वातावरण हे अगदी सर्वसामान्य कुटुंबात सुद्धा दिसून येत असे तिथे राजघराण्यातील स्त्रियांची त्यांच्या सामाजिक वावराची बंधने अधिकच कठोर होती. राजकन्या म्हणून गजराबाईंची जडणघडण अशाच घरंदाज वातावरणात झालेली होती. ती पाहता एक सामान्य युवती ते बडोद्यासारख्या राज्याची महाराणी आशा स्वरुपात स्वतःच्या व्यक्तिमत्त्वामध्ये त्यांनी घडवून आणलेले बदल खरोखरच क्रांतिकारक असे होते. महाराणींच्या व्यक्तिमत्व विकासात महाराज सायाजीराव गायकवाड यांचे योगदान सर्वात महत्वाचे होते. "महाराणी चिमणाबाईच्या शिक्षणाला त्यांच्या नातेवाईकांचा अथवा सनातनी हिंदूंचाच फक्त विरोध होता असे नव्हे तर स्वतः महाराणी साहेबही आधुनिक जीवन प्रणालीचा, कल्पनांचा स्वीकार करण्याच्या बाबतीत सुरवातीच्या काळात काहीशा उदासीन होत्या; पण महाराजांचा आधुनिक दृष्टिकोनावर विश्वास आढळत होता. शेवटी युरोपियन देशांचे अनेक दौरे, पाश्चात्त्य राजघराण्यातील अनेक जोडप्यांशी झालेले वैचारिक आदानप्रदान यामुळे स्त्री शिक्षण या विषयाचे महत्त्व महाराणीना मनापासून पटले व यातून सयाजीरावांच्या निर्भय आणि कर्तबगार पत्नीची नवी प्रतिमा निर्माण झाली. सामाजिक सुधारणा, स्त्रियांची उन्नती आणि राष्ट्रवाद याबद्दलच्या आपल्या कीर्तिवंत पतीच्या आंतरिक तळमळीला त्यांनी बरोबरीने साथ दिली." [१] महाराजांच्या प्रथम पत्नी चिमणाबाई यांचे अकाली निधन झाले होते त्यामुळे त्यांच्या सहजीवनाला आणि महाराणींच्या सामाजिक परिवर्तनाला, शिक्षणाला महाराजांना पुरेसा अवकाश मिळाला नाही. त्यामुळे पुनर्विवाह करताना वधू शिकलेली असावी अशी अट महाराजांनी कुटुंबियांना घातली होती. मात्र तत्कालीन कालखंडात स्त्रीशिक्षणाबाबत सर्वच स्तरात असलेली उदासीनता लक्षात घेता अपेक्षित वधु मिळणे अवघड गोष्ट होती. महाराजांनी विवाह होताच आपल्या पत्नीच्या शिक्षणाला प्रारंभ केला. “२८ डिसेंबर १८८५ रोजी महाराजांचा विवाह देवाच्या राजकन्या गजराबाई घाटगे यांच्याशी झाला. विवाहानंतर त्यांचे नाव चिमनाबाई द्वितीय असे ठेवण्यात आले. लग्नविधी उरकल्यानंतर महाराज आपल्या नववधूसह मकरपुरा राजवाड्यात राहण्यास आले. तेथे त्यांनी अगोदर नवीन महाराणींच्या शिक्षणाच्या व्यवस्थेकडे लक्ष पुरवले. त्यासाठी सगुणाबाई देव व नदबाई पितळे या दोन शिक्षिकांची योजना केली. यापैकी सगुणाबाई या महाराणींना मराठी शिकवत तर नदबाईकडे इंग्रजी शिक्षणाचे काम देण्यात आले होते. महाराणीच्या थोर पदवीला अनुरूप अशा प्रकारचा शिक्षणक्रम आरंभापासून योजण्यात आला होता. अर्थात तो पुरा करण्यासाठी त्यांना फार परिश्रम करावे लागले. वरील दोघी शिक्षिकाही सुस्वभावी असून शिक्षणाच्या कामी

पुष्कळ मेहनत घेत असत तरीपण त्यांच्याकडून महाराणींच्या शिक्षणात सुधारणा व्हावी तशी होत नाही असा अनुभव येऊ लागला. पुढे महाराजांनी त्यांना आपल्याबरोबर विलायतेस नेले त्यानंतर महाराणीच्या अभ्यासाला निराळे वळण लागले."[२] महाराणींच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये युरोपातील विविध देशांमध्ये केलेला प्रवास तिथे पाहिलेल्या स्त्री सुधारणेचा विविधांगी घटना, स्त्रीसक्षमीकरणाच्या विविध संस्था त्यांची कार्यपद्धती आणि एकूणच या जागतिक सामाजिक पर्यावरणाचा फार मोठा सहभाग होता. केवळ महाराजांच्या पत्नी म्हणूनच नव्हे तर खऱ्या अर्थाने एक स्वतंत्र प्रज्ञेची स्त्रीसुधारक म्हणून महाराणी चिमनाबाई द्वितीय यांनी केलेल्या कामाची वैचारिकतेच्या अंगाने दखल घेणे अतिशय महत्त्वाचे ठरते.

**अखिल भारतीय महिला परिषदेच्या कार्यातील महाराणी चिमणाबाई द्वितीय यांचे योगदान :**

आज घडीला संपूर्ण देशभर स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक सबलीकरणाच्या क्षेत्रात काम करणारी, स्त्रियांच्या विकासाच्या प्रश्नासाठी झटणारी देशव्यापी व महत्वाची महिला संघटना म्हणून 'ऑल इंडिया विमेनस कॉन्फरन्स' अर्थात अखिल भारतीय महिला परिषदेचा उल्लेख केला जातो. आज वटवृक्षामध्ये रुपांतरीत झालेला या अखिल भारतीय महिला परिषदेच्या रोपट्याचे रोपण करण्यामध्ये बडोद्याच्या महाराणी चिमणाबाई द्वितीय यांचा मोलाचा वाटा होता हे विसरून चालणार नाही. मार्गारेट कझिन्स यांनी अखिल भारतीय महिला परिषदेच्या स्थापनेचे महत्त्व भारतातील अनेक महिलांना समजावून सांगितले. राष्ट्रीय पातळीवर स्त्री शिक्षण व इतर प्रश्नाविषयी संघटितपणे प्रयत्न करणारी एखादी संघटना असावी असे प्रतिपादन त्यांनी केले. त्यांच्या या प्रयत्नांना महाराणी चिमणाबाई गायकवाड यांनी पाठिंबा दिला आणि त्यांना सर्वतोपरी मदत केली. या प्रयत्नांना यश येऊन इ. स.१९२७ मध्ये अखिल भारतीय महिला परिषदेचे स्थापना करण्यात आली. या परिषदेचा मुख्य आश्रयदात्या आणि आधारस्तंभ म्हणून महाराणी चिमणाबाई द्वितीय या खंबीरपणे परिषदेचा पाठीशी उभ्या राहिल्या. महाराणी चिमणाबाई द्वितीय यांचे एकूणच स्त्री शिक्षण, बालविवाह, पडदा पद्धती, स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण, अशा विविध क्षेत्रातील कार्य आणि देशभरातील स्त्रियांच्या सुधारणेची एक आंतरिक तळमळ पाहता अखिल भारतीय महिला परिषदेच्या सन १९२७ मध्ये पुणे येथे होणाऱ्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद महाराणी चिमणाबाई द्वितीय यांना एक मुखाने बहाल करण्यात आले . १९२७ मध्ये पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेज परिसरात भरलेल्या या पहिल्या महिला संमेलनावर महाराणी साहेबांच्या विचारांचा आणि एकूणच कार्याचा अमिट ठसा उमटला होता. अधिवेशनात महाराणी साहेबांनी केलेले अध्यक्षीय भाषण स्त्री शिक्षणाला एक नवी दिशा देणारे ठरले. अधिवेशनात पास झालेल्या एखाद्या दुसऱ्या ठरावांचा अपवाद वगळता सर्वच ठराव स्त्री शिक्षणाच्या समस्येशी संबंधित होते हे महाराणींच्या स्त्री शिक्षणाच्या तळमळीचे द्योतक होते. त्यातूनच पुढे अखिल भारतीय महिला परिषदचे उद्दिष्ट अधिक स्पष्ट होत गेले .

१ भारतातील स्त्रिया आणि बालके यांच्या सर्वसामान्य प्रगतीसाठी आणि कल्याणासाठी कृतिशील काम करणे.

२ आदर्श नागरिकत्वाचे धडे स्त्रियांना आणि मुलांना देणे.

३ स्त्रिया आणि मुलांच्या शिक्षणाला चालना देणे.

४ सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी कार्य करणे.

५ सर्वांना समान हक्क आणि समान संधी असावी यासाठी प्रयत्न करणे.

६ जीवनाच्या सर्वच क्षेत्रात उच्च नैतिक आदर्शासाठी आग्रही असणे.

७ जागतिक शांतता आणि आंतरराष्ट्रीय बंधुता यासाठी प्रयत्न करणे.

अशी विविध उद्दिष्ट समोर ठेवून वाटचाल करणाऱ्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या कार्याच्या एक दिशादर्शक म्हणून महाराणी चिमणाबाई दितीय यांचे कार्य महत्त्वाचे होते. अखिल भारतीय महिला परिषदेच्या माध्यमातून त्यांनी स्त्री शिक्षण या घटकाविषयी महिलांमध्ये जागृती घडवून आणण्यास प्राधान्य दिले. स्त्रियांना फक्त एक आदर्श माता किंवा आदर्श पत्नी म्हणून जगण्या इतपतच शिक्षण देणे बरोबर नव्हे तर एक आदर्श माता, आदर्श पत्नी आणि देशाची एक आदर्श नागरिक म्हणून समृद्धपणे जीवन जगण्याची क्षमता स्त्रियांच्या अंगी येण्याजोगी शिक्षण मिळवून द्यावे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली होती, आणि हीच भूमिका पुढे अखिल भारतीय महिला परिषदेने आग्रहाने मांडली. स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण बनविणारा अभ्यासक्रम आवश्यक आहे हे महाराणींचे स्त्री सबलीकरणाचे मूलभूत विचार होते. अखिल भारतीय महिला परिषदेच्या माध्यमातून त्यांनी सहशिक्षण, धर्मनिरपेक्ष शिक्षण या बाबींना ठामपणे पाठिंबा दिला. तत्कालीन सामाजिक परिप्रेक्ष्यामध्ये अखिल भारतीय महिला परिषदेने स्त्रियांच्या शिक्षणासाठी महिला शिक्षकांची नेमणूक करण्याविषयी आग्रही भूमिका मांडली व तिचा सतत पाठपुरावा केला. प्रौढ शिक्षणावरही भर दिला आणि या संपूर्ण शैक्षणिक कार्यात महाराणी साहेबांनी अखिल भारतीय महिला परिषद मोलाची साथ दिली.

समाजसुधारणेच्या क्षेत्रात महाराज सयाजीराव गायकवाड सर्वांगीण दृष्ट्या प्रयत्न करत असताना महाराणी चिमनाबाई यांनी मात्र आपले सर्व लक्ष स्त्रियांच्या सुधारणा या घटकाकडे केंद्रित केले होते. स्त्री शिक्षणाबरोबरच समाजसुधारणेच्या क्षेत्रातही महाराणी चिमनाबाई यांनी योगदान दिले. केवळ बडोदा संस्थानातच नव्हे तर अखिल भारतीय महिला परिषदेच्या माध्यमातून देशभरातील स्त्रीशिक्षणाबरोबरच, बालविवाह, बहुपत्नीकत्व, विधवा पुनर्विवाह बंदी घटस्फोटावर बंधने यासारख्या स्त्रियांच्या जीवनाला बंदिस्त करणाऱ्या प्रथांविरुद्ध समाजसुधारणेची कृतीयुक्त भूमिका त्यांनी घेतली. महाराणी चिमणाबाई द्वितीय स्त्री-पुरुष समतेचा कट्टर पुरस्कर्त्या होत्या. स्त्री-पुरुष विषमतेला खतपाणी घालणाऱ्या सर्व प्रथा आणि परंपरांना त्यांनी सातत्याने विरोध केला. स्त्रिया आणि बालके यांच्या अनैतिक व्यापारावर व त्यातून उद्भवणाऱ्या समस्येवर अखिल भारतीय महिला परिषद प्रभावी कार्य सुरू

केले होते. देवदासीसारख्या स्त्रियांचे शोषण करणाऱ्या दुष्ट सामाजिक विरुद्ध परिषदेने आवाज उठविला सती प्रथेविरुद्धही परिषदेने आवाज उठविला होता. स्त्रियांच्या सुधारणेच्या सर्वच क्षेत्रातील परिषदेचा आवाज अधिक बुलंद होण्यास महाराणी चिमणाबाई द्वितीय यांचे परिषदेला असलेले पाठबळ अधिक मोलाचे ठरले. महाराणी चिमनाबाई या केवळ स्वत: स्त्रियांच्या सुधारणेच्या कार्यात सामील झाल्या व त्याचे नेतृत्व केले असे नाही तर त्यांनी तत्कालीन कालखंडात भारतात अस्तीत्वात असलेल्या इतर संस्थानातील महाराण्यांनाही आखील भारतीय महिला परिषदेशी जोडण्यात मोठा हातभार लावला होता. त्यामुळेच स्त्रियांचा सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रातील सुधारणांसाठी परिषदेला आर्थिक , राजकीय व मानसिक पाठबळ मिळू शकले. महाराणी चिमनाबाई यांनी बडोदा राज्यामध्ये स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उभारलेल्या उद्योगधंद्यांच्या तसेच विविध संस्थांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अखिल भारतीय महिला परिषदेनेही देशभर महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मोहीम राबविली . वारसा हक्क आणि संपत्तीत समान अधिकार मिळावे अशी महाराणी चिमनाबाई यांची भूमिका होती , तीच महत्त्वाची भूमिका पुढे परिषदेने घेतली. नोकरदार स्त्रियांचे प्रश्नदेखील हाती घेतले. अखिल भारतीय महिला परिषदेने स्त्रियांच्या मताधिकार चळवळीला पाठिंबा दिला होता. १९३७ च्या प्रांतीय कायदेमंडळाच्या निवडणुकांमध्ये निरनिराळया राजकीय पक्षांकडून उभ्या असलेल्या स्त्रियांना परिषदेने पाठिंबा दिला आणि त्या पाठिंब्याच्या जोरावरच ५४ स्त्रिया निवडून आल्या मात्र निवडून आलेल्या स्त्रियांचा पुढे अखिल भारतीय महिला परिषदेच्या कार्याला किंवा सर्वसामान्य स्त्रियांचा उन्नतीला काहीही फायदा झाला नाही. कारण निवडून आलेल्या स्त्रियांनी स्त्री म्हणून स्वतःचे मत, निर्णय स्वातंत्र्य, स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी खंबीरपणे उभी राहण्याची वृत्ती यापेक्षा पक्षश्रेष्ठी, पक्षनिष्ठा, पक्षउद्देश या गोष्टींना अधिक प्राधान्य दिले. त्यामुळे परिषदेचा भ्रमनिरास झाला व पुढील काळात राजकारणापासून दूर राहून स्त्रियांच्या सुधारणेचे कार्य करण्याचे धोरण परिषदेने स्वीकारले. अर्थात अखिल भारतीय महिला परिषदेच्या वैचारिक बांधणीत महाराणी चिमणाबाई द्वितीय यांचे वेळोवेळी मार्गदर्शन होत असे.

**महाराणी चिमणाबाई द्वितीय यांचे अध्यक्षीय भाषण- AIWC ची वैचारिक पायाभरणी :**

महाराणी चिमणाबाई द्वितीय यांनी अखिल भारतीय महिला परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या अध्यक्ष म्हणून मांडलेले विचार हे आधुनिक भारतीय स्त्री चळवळीचा पाया ठरणारे महत्त्वपूर्ण विचार होते. कारण त्यानुसारच पुढील कालखंडामध्ये अखिल भारतीय महिला परिषदेची वाटचाल दमदारपणे होऊ शकली. आपल्या भाषणाच्या अगदी प्रारंभीच महाराणी साहेबांनी अखिल भारतीय महिला परिषदेने आयोजित केलेल्या, पहिल्या अधिवेशनाची ऐतिहासिकता व त्याचे मौलिकत्व स्पष्ट केले. हा प्रसंग म्हणजे भारतातील सर्व स्त्रियांनी एकत्र येण्याचा पहिलाच ऐतिहासिक प्रसंग आहे याची त्यांनी आवर्जून माहिती दिली. या परिषदेचे उद्देश सांगताना त्या म्हणाल्या होत्या की आपण फक्त स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी एकत्रित आलो नसून खऱ्या अर्थाने आपण आपल्या राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाच्या चर्चेसाठी एकत्रित आलेलो आहोत. "We are privileged to be called to take part in a noble task. This opportunity, used with a sense of its responsibilities, with a vision of its enormous possibilities, will make history. Here, with the rising tide of revival of Indian culture; here, at the beginning of what may rightly be regarded as an Indian Renaissance, we are assembled to discuss that which, more than all else, goes to the root of the rebirth of a great people. We are assembled to discuss tht which, more than all else , goes to the root of the rebirth of a great people. We are assembled to discuss those things which are essential for the education and the general well being of the future mothers of the race.[3]

भारतातील स्त्रियांच्या शिक्षणासंबंधी आणि त्यांच्या एकूणच सक्षमीकरण यासंबंधी मूलभूत चर्चेसाठी व त्या चर्चेतून कृतीयुक्त कार्यक्रम देण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे याबाबतची भूमिका महाराणीने आपल्या अध्यक्षीय भाषणाच्या अगदी सुरुवातीलाचा मांडून ' उक्ती पेक्षा कृती महत्वाची' हाच संदेश परिषदेसाठी उपस्थित असलेल्या तमाम स्त्रियांना दिला . एका अर्थाने देशभरातील एकत्रित आलेल्या या स्त्रियांना स्त्री शक्तीची जाणीव आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच करून देत त्यांनी समस्त स्त्रियांमध्ये एक उत्साह निर्माण केला. अखिल भारतीय महिला परिषदेच्या रुपाने आपण स्त्री चळवळीचा पाया घालत आहोत असेही त्यांनी यानिमित्ताने जाहीरपणे सांगितले. [४] स्त्री म्हणून स्त्रियांना आपल्या क्षमतांची पुन्हा एकदा ओळख करून देताना महाराणीने त्यांना हेही सांगितले की स्त्री म्हणून आपल्याला मागे ओढू पाहणाऱ्यांना आपली ही एकता म्हणजे एक आव्हान असणार आहे. कारण आपण सर्व स्त्रिया गुलामगिरी वर स्वातंत्र्याचा व अंधकारावर प्रकाशाचा विजय मिळवण्यासाठी एकत्र आलो आहोत. Friends, hair and river in India news of this conference may penetrate, let us at once declared that the fact of these all India conference of women, the first of its kind, it's a sign that remain have already attend the power of national expression. Let us make this beginning of a movement which will deserve and demand the support of every man who has ever respected his mother, of every woman who has the intelligence to understand. Conference search as this should do much to solve the difficult problems of the ways and means of attaining the ideal we set before ourselves. A conference search at this should be a call to action; challenge to those who would hold us back, an inspiration to cooperation in a victory of freedom and

enlightenment over darkness and slavery.[5] अखिल भारतीय महिला परिषदेच्या रूपाने भारतातील स्त्रियांच्या संघटनाचा तो पहिला राष्ट्रीय प्रयत्न होता आणि त्यास महाराणी चिमणाबाई यांनी भरीव असे सहकार्य केले होते.

महाराणी चिमनाबाई यांचे अध्यक्षीय भाषण म्हणजे भारतीय स्त्रियांच्या तत्कालीन परिस्थितीचा समग्र आढावा घेणारे अतिशय उत्कृष्ट असे भाषण होते , जो तत्कालीन इतिहासाचा एक मौलवान दस्तावेज ठरतो. अखिल भारतीय महिला परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाची सुरुवात पुण्यासारख्या ऐतिहासिक व स्त्रीशिक्षणात अग्रेसर असणाऱ्या शहरात झाल्याचे समाधान त्यांनी बोलून दाखवले. १८४८ मध्ये पुण्याच्या भिडे वाड्यात महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा करून स्त्री शिक्षणाची चळवळ सुरू केली होती. अशा या शहरात हे अधिवेशन भरणे महाराणीना अधिक मोलाचे वाटले असावे , कारण महाराज सायाजीराव गायकवाड यांना महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्या बद्दल प्रचंड आस्था होती. त्याबद्दल महाराजांनी महात्मा फुले यांचा बडोद्यात बोलावून गौरव देखील केला होता . इतकेच नव्हे तर महात्मा फुले यांच्या निधना नंतर सावित्रीबाई फुले यांना आर्थिक मदत देखील केली होती.महाराजांच्या कार्याच्या साक्षीदार असलेल्या महाराणींना या परिषदेच्या निमित्ताने महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्त्रीशिक्षणाच्या कार्याचे स्मरण झाले. महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी आहे त्यामुळे या कर्तुत्ववान आणि वीर भूमीत होणारे संमेलन स्त्रियांच्या उज्वल भविष्यात पायाभरणी करणारे ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला . छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा उल्लेख करत असतानाच अशा या कर्तुत्ववान पुत्रास घडविणाऱ्या मातेचा अर्थात राजमाता जिजाऊ यांचा अतिशय सन्मानपूर्वक उल्लेख केला होता. जिजाबाईनी फक्त महाराजांना जन्म दिला नाही तर त्यांच्यातील कार्यक्षमतेला आणि अलौकिक कर्तृत्वाला देखील जन्म दिला असे गौरवोद्गार महाराणी यांनी काढले होते. भारतातील प्रत्येक स्त्रीने राजमाता जिजाऊंचा आदर्श घ्यावा असे आव्हान त्यांनी जमलेले स्त्रियांना केले होते. स्त्री ही केवळ व्यक्तीच्या देहालाच नव्हे तर त्याच्या आत्म्यास आकार देणारी एक कर्तुत्व मूर्ती आहे आणि त्यामुळेच तिने राष्ट्रहितासाठीआपले योगदान देणे आवश्यक आहे असे प्रतिपादन त्यांनी केले होते. I may be allowed to congratulate Poona, and specially those who in Poona have been pioneers in the cause of the education of women. On the fact that this conference should be held first in this city. I am sure our conference will derive some rich inspiration from the past traditions of the place as from its modern culture and intellectual refinement. My mind cannot but recall how much Maharashtra, and not Maharashtra alone, owes to manliness of Shivaji Maharaj, my mind cannot but recall the extent to which the character of this great leader of men depended upon the education and training he received under the loving care of a mother, deserted, yet awake to he highest function. Having given birth to his body she gave herself up to the much longer process of the birth of this personality. Let us recognise the womanhood should be able to produce not merely healthy bodies but healthy souls. Let us recognise that for this, for themselves, and for the general happiness, women must have all that is implied by the well known pharase: *means sane in corpore sano* ."[6]

भारतीय समाजसुधारणेचा विचार मांडत असताना महाराणी चिमणाबाई द्वितीय यांनी या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन विचार मांडले. भारतातील बहुसंख्य सामाजिक प्रश्नांची निर्मिती ही भारतीय स्त्रियांच्या दुय्यम दर्जा मधून झालेली आहे असे सडेतोड विचार त्यांनी प्रतिपादन केले. इतकेच नव्हे तर जगातील इतर कोणत्याही धर्माने जितके श्रेष्ठत्व स्त्रियांना दिलेले नसेल तितके हिंदू धर्माने दिलेले आहे ; मात्र वास्तवात स्त्रियांची स्थिती अतिशय अधोगतीला पोहोचलेली आहे त्याचे कारण विचार आणि व्यवहार यात असलेली तफावत हे आहे हे देखील त्यांनी अधोरेखित केले होते. आपल्या भाषणात महाराणीने स्त्री पुरुष समतेच्या विचारांची आवश्यकता प्रतिपादन केली. त्यांच्यमते स्त्री आणि पुरुष हे एकमेकांचे प्रतिस्पर्धी नसून त्यांच्या एकमेकांच्या समान सहभागातूनच राष्ट्राचा विकास होणार आहे, आणि म्हणूनच स्त्री सुधारणा चळवळी मध्ये पुरुषांचा सहभाग देखील तितकाच महत्त्वाचा आहे. देशात ज्या थोर समाजसुधारकांनी स्त्रियांच्या सुधारणेसाठी पुढाकार घेतला त्यांच्याबद्दल कृतज्ञता महाराणींच्या वक्तव्यात दिसून येते. त्यामुळेच त्या म्हणतात सुधारणेच्या कार्यात सर्व बाजूंनी आपणास मदत झालीच पाहिजे या कार्यात स्त्रियांनी आणि आधी पाऊल उचलले पाहिजे पुरुष आपल्याला साथ देण्यास तयार आहेतच.[७] स्त्रियांनी मांनापासून ठरवले तर कोणत्याही सामाजिक प्रथांचा नायनाट करणे त्यांना अशक्य नाही असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. त्यांनी आपल्या भाषणात बालविवाह, संमती वयाचा कायदा, पडदा पद्धतीचे दुष्परिणाम, स्त्रियांचा राजकीय हक्क, स्त्री शिक्षण, स्त्रियांचे आरोग्य विषयक प्रश्न, सहशिक्षण, मुलींसाठी शिक्षणाची विशिष्ट व्यवस्था, स्त्री शिक्षणाच्या विविध अडचणी, पाश्चिमात्य जीवनशैलीचे अंधानुकरण, स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन , त्यांचे राजकीय हक्क, स्त्रियांना वारसा हक्क मिळवून देण्यासाठी कायद्याची आवश्यकता, देशभरातील विविध संस्थानांतील राण्या आणि महारांना स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी पुढे येण्याचे आव्हान आणि एकंदरच फक्त बोलण्यापेक्षा कृतीतून स्त्री सुधारणा चळवळीला ठोस कृती कार्यक्रम आणि योजना तयार करून देण्याचे आव्हान स्त्रियांनी स्वीकारण्याची वेळ आलेली आहे याबाबतचे अतिशय तपशीलवार वर्णन केलेले आहे . आखील भारतीय महिला परिषदेच्या व पुढील काळातील महिला चळवळीला दिशा दर्शक ठरावे असे अभ्यासपूर्ण भाषण महाराणी चिमणाबई द्वितीय यांनी दिले होते.

त्यांनी आपल्या भाषणातून सर्वात आधी भारतातील बालविवाहाच्या प्रश्नाचा चांगलाच समाचार घेतला होता. बालविवाह म्हणजे स्त्रियांच्या शिक्षणातील आणि त्यांच्या सर्वांगीण प्रगतीतील सर्वात मोठा अडसर असल्याचे मत त्याने व्यक्त केले होते. ज्या वयामध्ये छोट्या मुलीला आपल्या शरीराचे ओळखही झालेली नसते विवाह म्हणजे काय याची जाणीवही झालेली नसते अशा शारीरिक व मानसिक अपूर्ण वाढीच्या काळात मुलीचा विवाह करून देणे हा खऱ्या अर्थाने पोरखेळ आहे असे त्या म्हणाल्या होत्या. बालविवाह मुलीसाठी जसा घातक आहे तसा तो मुलांसाठी देखील घातकाच आहे कारण बऱ्याचदा मुलाचाही विवाह बालपणातच होत असल्याने त्याच्यावर ही हा एक प्रकारचा अन्यायच आहे असे त्या म्हणतात. अनेकदा चार-पाच वर्षाच्या मुलीचे लग्न तिच्यापेक्षा वयाने खूप मोठे असणाऱ्या मुलाशी अर्थात घोडनवऱ्याशी करून दिल्यावर त्या मुलीवर होणाऱ्या शारीरिक अत्याचाराचे कल्पनाच किती वाईट आहे हेही नोंदवतात. अशा बालविवाहातून पती-पत्नी हे सुंदर नाते निर्माण होणे व बहरणे शक्य नाही हेही त्यांनी त्यांच्या भाषणात आवर्जून सांगितले होते. खेळण्य-बागडण्याच्या वयात मुलीवर लादले गेलेले मातृत्व हे केवळ त्या मुलीच्या आरोग्याच्या दृष्टीनेच नव्हे तर देशाच्या निर्मितीच्या व विकास प्रक्रियेच्या दृष्टीने देखील घातक आहे, कारण बालपणीच मातृपद मिळालेल्या मुलीकडून तिच्या अपत्याचे सुयोग्य जडण-घडण होईल अशी अपेक्षा बाळगणे अतिशयोक्त ठरणारी आहे हे महाराणी चिमनाबाई यांनी आपल्या भाषणातून अगदी सडेतोडपणे सांगितले होते.[८] त्यांनी बालविवाहावर फक्त कठोर टीकाच केली नाही तर ही प्रथा नष्ट करण्याचे आव्हान उपस्थितांना केले. मुलीच्या विवाहाची वयोमर्यादा १८ वर्षापर्यंत वाढविल्यास राष्ट्राच्या भावी पिढीसाठी समर्थ माता निर्माण होऊ शकतात इतकेच नव्हे तर समर्थ नागरिक म्हणून स्त्रिया आपली भूमिका निभावू शकतात असेही त्यांनी आग्रहाने सांगितले. बालविवाहाची भयानकता सांगताना त्यांनी सती प्रथेच्या उदाहरणाचा आधार आपल्या भाषणात घेतला होता. बालविवाह आणि सती प्रथा या दोन्ही प्रथा स्त्रियांसाठी अतिशय वाईट आहेत; मात्र त्यातही विचार करताना त्यांनी सतीच्या पद्धतीपेक्षा बालविवाहाची पद्धत किती घातक आहे याचे विवेचन केले. सतीच्या प्रथेपेक्षाही बालविवाहाची प्रथा भयंकर आहे कारण सती जाताना जीवंतपणे जळताना स्त्रीला भोगाव्या लागणाऱ्या यातना प्रचंड आहेत मात्र त्या थोड्या वेळासाठीच होतात ; मात्र बाल विवाहामुळे स्त्रीला संपूर्ण आयुष्य दुःखाच्या संकटाच्या अग्नीत जाळावे लागते आणि त्यांच्या आयुष्याची जिवंतपणे होळी होते. त्यामुळेच कायद्याने सतीची चाल बंद केली तसे तातडीने बालविवाहाची चाल सुद्धा प्रथा सुद्धा बंद करणे किती निकडीचे आहे हे सांगितले. If we think of what is involved in child marriage, we must admit that there are even more reasons for this to be forbidden by law then there were against sati. The letter was a short period of terrible torture; the former may mean a lifetime of on unutterable misery.[9] महाराणीने आपल्या भाषणात व्यक्त केलेले विचार आणि तत्कालीन कालखंडातील बालविवाहातून निर्माण झालेल्या अनेक समस्या यांचा विचार करता महाराणीने मांडलेले मुद्दे किती रास्त होते याचा प्रत्यय येतो. बालविवाहामुळे आपसूकच बंद होणारे स्त्रीशिक्षण आणि शिक्षणाच्या अभावी अज्ञानातून निर्माण होणारे अनेक प्रश्न ही एक अखंड मालिका आहे, त्यामुळे स्त्री शिक्षणासाठी बालविवाह प्रथा नष्ट करणे आवश्यक आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते . जरठ-कुमारी विवाहातून बालपणीच वैधव्य येण्याचे प्रमाण मोठे होते. बाल विधवांचे कष्टप्रद जिने, त्यांचे होणारे लैंगिक शोषण त्यातून उदयास आलेली बालहत्येची प्रथा अशा अनेक प्रथा एकातून दुसरी आशा निर्माण होत जातात . त्यातून स्त्रियांचे जीवन नरकप्राय होते . याचे अतिशय महत्वाचे भान महाराणीने श्रोत्यांना दिले. आपल्या भाषणात त्यांनी संमती वयाच्या कायद्याचे स्वागत करून त्यासाठी सर हरिसिंग यांचे जाहीरपणे स्त्री वर्गाच्या वतीने आभार व्यक्त केले. संमती वयाच्या कायद्यानुसार मुलीच्या विवाहाची मर्यादा सोळा वर्ष करावी असे मागणी करण्यात आली होती त्यास पाठिंबा देणारा ठराव या परिषदेत मांडण्याचे आव्हान महाराणींनी केले होते. त्यांच्या मते कोणतेही राष्ट्र सुसंस्कृत आणि सुशिक्षित व पुढारलेले बनवण्यासाठी करण्यात येणाऱ्या सर्वोच्च प्रयत्नांचे यश किंवा अपयश बालविवाहाच्या प्रथेत केल्या जाणाऱ्या सुधारणंवरच अवलंबून आहे आणि म्हणूनच अखिल भारतीय महिला परिषद देणे बालविवाहाच्या प्रथेविरुद्ध संपूर्ण देशभर जनजागृती करण्याचे कार्य हाती घ्यावे असे कळकळीचे आव्हान महारणी चिमणाबाई द्वितीय यांनी केले. [१०] आपली कन्या इंदिराराजे यांचा विवाह देखील प्रौढ वयात करून दिला इतकेच नव्हे तर त्यांनी आपल्या मुलीला तिच्या इच्छेनुसार निवडलेल्या पतीशी विवाह करण्याची संमती दिली . तत्कालीन कालखंडातील राजघराण्यांतील प्रथा परंपरा पाहता तो प्रेमविवाह म्हणजे एक क्रांतिकारी घटना होती. आणि महाराज सयाजीराव गायकवाड आणि महाराणी चिमणाबाई द्वितीय यांनी स्वीकारलेल्या पुरोगामी , परिवर्तनवादी आधुनिक विचारांची एक प्रकारे पावती होती.

तत्कालीन सामाजिक परिस्थितीप्रमाणे एक राजघराण्यातील स्त्री म्हणून, महाराणी म्हणून येणाऱ्या अनेक सामाजिक रूढी परंपरांचा भाग म्हणून स्वतः महाराणी चिमणाबाई द्वितीय यांनी विवाहानंतर पडदा पद्धतीचा अवलंब केलेला होता. त्यानिमित्ताने पडदा पद्धत तिच्या दोषांत सहित स्वतः अनुभवली होती. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्यासह जगभर प्रवास करत असताना महाराणी चिमनाबाई कधीच पडद्याचा अवलंब करत नसत ; मात्र भारतात परत आल्यानंतर त्यांना येथील राजकीय रितीरिवाजानुसार पडदा पद्धतीचा अवलंब करावा लागत असे. कालांतराने महाराणींनी स्वतः धैर्याने या पद्धतीला झुगारून लावले. ज्यावेळी पडद्याशिवाय त्या महाराजांच्या सोबत त्यांच्या शेजारी दरबारात बसल्या , तेव्हाचा तो क्षण म्हणजे जणूकाही एक क्रांतीच होती. स्वतः महाराज सयाजीराव गायकवाड यांचाही पडदा पद्धतीला कट्टर विरोध होता. मात्र तरीही त्यांनी पडदा पद्धतीचा त्याग करण्याची कोणती जबरदस्ती महाराणी चिमणाबाई यांच्यावर कधीही केली नाही. याउलट महाराणींचे स्वतःचे मतपरिवर्तन होऊन, त्यांनी स्वतः पडदा पद्धतीचा त्याग करावा यासाठी संयमाने प्रयत्न केले. आणि शेवटी त्या प्रयत्नांना यश येऊन महाराणी चिमणाबाई यांनी

स्वतः पडदा पद्धती झुगारून लावलीच , पण त्याचबरोबर इतर स्त्रियांना देखील त्यासाठी प्रेरित केले. तत्कालीनकालखंडातील संस्थानिक महाराण्यांमध्ये पडदा पद्धतीचा त्याग करणाऱ्या महाराणी चिमणाबाई द्वितीय या पहिल्या महाराणी असाव्यात. आपल्या भाषणात त्या म्हणतात की पडण्याची पद्धत बंद करावी कारण ही पद्धत स्त्रियांच्या आरोग्याला व सुखाला अडथळा ठरणारी आहे. पडदा पद्धतीमुळे स्त्रियांचा शारीरिकच नव्हे तर मानसिकही विकास खुंटून जातो. त्यांना स्वतंत्रपणे स्वातंत्र्याचा उपभोग घेता येत नाही . स्त्रियांना आनंददायी जीवन जगता येण्यासाठी पडदा पद्धती बंद करणे अत्यंत आवश्यक आहे. we have also to insist on the abolition of the custom of pardha. Adopted in earlier times for the protection of women, it is now not only no longer needed as those dangers are over. But it has itself become a danger to health and happiness. but surely there is no necessity to enter into a description of the many evils of this practice, with its in enfeeblement of body and with its starvation of the mind. If women are to take their part in the rising of the tone of social life, if they are to understand the duties and responsibilities for which their sons must be trained, the pardah must go. If women are to have that freedom of mind and that variety of interest without which there can be no joyous life, the parda must go. The woman behind her pada is as much a captive as a bird in the cage. Pent up behind the parda she is steped in ignorance and allowed to grow and to flourish like a pet animal. No Ray of light and enlightment can penetrate into the Zenana.[11] आपले विचार मांडताना त्यांनी तत्कालीन कालखंडामध्ये सुरू असलेल्या सामाजिक सुधारणा आधी ही राजकीय स्वातंत्र्य आधी या रंगलेल्या वादाचा अप्रत्यक्ष संदर्भ दिला आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांनी सामाजिक सुधारणेचे कार्य दुय्यम ठरवले याबद्दल खंत व्यक्त केली. उपरोधाने त्यांना प्रश्न विचारण्यासाठी त्यांनी प्रसिद्ध विचारवंत शेले याच्या वाक्याचा आधार घेतला, आणि विचारले की स्त्रिया जर गुलाम राहिल्या तर पुरुषच स्वतंत्र होतील काय?[१२] थोडक्यात स्त्रियांच्या प्रगती शिवाय होणारी कोणतीही राजकीय सामाजिक आर्थिक प्रगती ही एकांगी स्वरूपाची असेल असे अतिशय धाडसी मत त्यांनी मांडले. अखिल भारतीय महिला परिषदेने स्त्रियांना अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. भारतातील संपूर्ण स्त्रियांनी आपले म्हणणे, आपले प्रश्न जर मांडले तर भारत सरकार इतकेच काय भारतातील विविध संस्थानिकांचे संस्थानिक देखील स्त्रियांच्या मदतीला नक्कीच येतील असा आशावाद व्यक्त केला . मात्र त्यासाठी अखिल भारतीय महिला परिषदेच्या वतीने जनजागृतीची मोहीम हाती घेणे व आपले म्हणणे लोकांपर्यंत पोहोचवून स्त्रियांच्या प्रश्नाबाबत जनमत तयार करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

महाराणींनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये भारतीय समाजात स्त्रियांबद्दल असलेल्या विविध समस्या फक्त मांडल्या नाहीत तर आपल्या भाषणातून त्यांनी भारतामध्ये मागील काही वर्षात स्त्री शिक्षण आणि स्त्रियांमधील जागृती याबाबत काही प्रमाणात होत असलेल्या सकारात्मक बदलांची दखल देखील घेतली . घेतली त्यांनी यांना मिळालेल्या मतदानाच्या हक्काचा अधिकार उद्धृत केला. मद्रास प्रांतातील मुथूलक्ष्मी रेड्डी यांची कौन्सिलमध्ये नेमणूक झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. जगभरातील स्त्रियांच्या मताधिकार चळवळीची चांगलीच माहिती महाराणी चिमणाबाई यांना होती आणि त्यामुळेच जगभर स्त्रियांच्या मतदानाच्या अधिकाराला जसा पुरुषांचा विरोध झाला तसा भारतात मात्र झाला नाही याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला. उद्योगधंदे, कायदा, वैद्यकीय व्यवसाय, साहित्य व इतर अनेक क्षेत्रांमध्ये स्त्रिया जी कामगिरी करत आहेत त्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले होते. मात्र हे करत असताना केवळ काही स्त्रियांनी प्रगती केली म्हणजे देशातील संपूर्ण स्त्री वर्गाची प्रगती झाली असे म्हणता येणार नाही हे वास्तव देखील सर्वांच्या लक्षात आणून दिले.

महाराणी चिमणाबाई यांनी केलेले अध्यक्षीय भाषण हे अतिशय अभ्यासपूर्ण असे भाषण होते भारतातील स्त्री शिक्षणाची प्रगती त्यांनी अगदी आकडेवारीनुसार श्रोत्यांसमोर मांडली आणि स्त्रियांच्या शिक्षणाची प्रगती फारशी समाधानकारक नसल्याची खंत देखील आखील भारतीय महिला परिषदेच्या मंचावरून व्यक्त केली. स्त्री शिक्षण हा या परिषदेतील सर्वात महत्त्वाचा विषय होता भारतातील स्त्रिया हजारी एकवीस या प्रमाणात साक्षर आहेत तर दहा ते पंधरा वर्ष वयापर्यंतच्या मुलींच्या साक्षरतेचे प्रमाण दर हजारी २८ इतके आहे. पंधरा ते वीस वर्षे वयोगटातील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण दर हजारी ३६ आहे तर १०००० स्त्रियांमध्ये फक्त १३ स्त्रियांना इंग्रजी शिक्षण मिळाले आहे अशी आकडेवारी त्यांनी जाहीर केली.[१३] त्यांच्या भाषणातून स्त्री शिक्षणाचे तत्कालीन कटू वास्तव परिषदेच्या निदर्शनास आणून दिले. अखिल भारतीय महिला परिषदेला स्त्री शिक्षणाच्या बाबतीत किती मोठा पल्ला गाठावा लागणार आहे याचेच सूतोवाच महाराणीने आपल्या भाषणातून केले होते. स्त्रीशिक्षणाच्या होणाऱ्या प्रयत्नांचे नोंद घेऊन यामध्ये आणखी जोरकसपणे भर घालण्याचे आव्हान त्यांनी केले . स्त्रियांच्या शिक्षणाबाबत फक्त समस्या मांडून भागणार नाही तर त्यावर पुढील काळात करावयाच्या उपाययोजनांचे आराखडे तयार करून त्यानुसार सूत्रबद्ध पणे वाटचाल करणे आवश्यक असल्याचेही यानिमित्ताने त्यांनी दाखवून दिले. त्यांनी सहाशिक्षणाला नेहमीच पाठिंबा दिला होता, स्त्री आणि पुरुष हे निसर्गातील समान घटक आहेत त्यामुळे त्यांना एकत्र शिक्षण देणे वावगे नाही असे त्यांनी यानिमित्ताने सांगितले. स्त्रिया आणि पुरुष यांच्यात होणाऱ्या भेदभाव यामुळे समाजात चुकीचे समज निर्माण होतात कुटुंबात जसे मुलगा आणि मुलगी एकत्र राहतात आणि वाढतात तसेच शाळेमध्ये देखील मुला-मुलींना एकत्र शिक्षण द्यावे असे त्यांचे मत होते ; मात्र तत्कालीन समाजात स्त्रियांच्या शिक्षणाकडे पाहण्याचा जो

नकारात्मक दृष्टिकोन होता तो पाहता स्त्रियांना केवळ सहशिक्षणामुळे शिक्षणापासून वंचित रहावे लागू नये म्हणून स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा सुरू करण्याची आवश्यकता भासल्यास तेही करावे असेही त्यांनी म्हटले.[१४] स्त्रीयांची कार्यक्षमता व गुण यांची जोपासना करणे हेच शिक्षणाचे मुख्य कर्तव्य आहे त्यासाठी स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा आणि कॉलेज यांची स्थापना करण्याची आवश्यकता देखील प्रतिपादन केली.

स्त्रियांच्या शिक्षणासाठी आवश्यक तो योग्य असा अभ्यासक्रम असण्याकडे हे त्यांनी निर्देश दिले आरोग्य , गृहविज्ञान, बालसंगोपन, संगीत, चित्रकला असे शिक्षण मुलींना द्यावे असे वेळोवेळी सांगितले जाते पण हे नुसते सांगून भागणार नाही तर त्याबाबतच्या योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी सुधारकांनी व सर्वसामान्यांनी पुढे यावे. स्त्रियांनी काय करावे यावर केवळ चर्चा करणे पुरेसे नाही तर सुशिक्षित स्त्रियांनी त्यासंबंधी माहिती देणारी, जागृती करणारे पुस्तके लिहिणे आवश्यक आहे त्यायोगे समाजात जागृती घडून येण्यास मदत होईल हे कार्य अखिल भारतीय महिला परिषद देणे हाती घ्यावे असेही त्यांनी सुचवले. स्त्रियांचे शारीरिक शिक्षण हा महाराणींच्या विचार विश्वातील एक महत्त्वाचा विषय होता. त्यांनी बडोदा संस्थानात स्त्रियांना शारीरिक शिक्षण देण्यासाठी विशेष व्यायामशाळा सुरू केल्या होत्या. महाराणीना स्वतः देखील व्यायामाची, खेळाची आवड होती. त्या टेनिस अतिशय आवडीने खेळत असत. त्यामुळेच आपल्या भाषणात त्यांनी स्त्रियांना आरोग्य शिक्षणाचे, व्यायामाचे महत्त्वदेखील पटवून सांगितले होते. ते सांगताना त्यांनी स्त्रियांनी आपली शरीर संपत्ती जोपासण्यासाठी व्यायामाचे कास धरावी असा मोलाचा संदेश दिला होता. स्त्रियांमध्ये व्यायामा बाबत स्वतःच्या शरीराची काळजी घेण्याबाबत जास्तीत जास्त जागरूकता निर्माण व्हावी यासाठी अखिल भारतीय महिला परिषदेने जनजागृतीचा कार्यक्रम हाती घ्यावा असेही त्यांनी यावेळी सुचित केले. महाराणींच्या मते व्यायामामुळे फक्त शरीरच सुदृढ होते असे नव्हे तर एक प्रकारचा उत्साह आणि आनंद देखील निर्माण होतो.

महाराणी चिमनाबाई यांचे हे व्याख्यान अखिल भारतीय महिला परिषदेच्या पुढील कार्यास दिशा देणारे ठरले. त्यांच्या मते स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी खऱ्या अर्थाने प्रशिक्षित अशा महिला शिक्षकांची आवश्यकता आहे आणि त्यासाठी स्त्रियांना प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू करणे निकडीचे आहे. हा मुद्दा मांडत असताना त्यांनी लेडी आयर्विन यांना याबाबतचे आवाहन केले आणि भारतीय स्त्रियांच्या प्रगतीस हातभार लावण्याची त्यांचे इच्छा असेल तर त्यासाठी महिलांना प्रशिक्षण देणारे एक ट्रेनिंग कॉलेज काढण्यासाठी त्यांनी सरकार दरबारी आपल्या शब्दाचे वजन वापरावे असे सुचवले. कारण असे ट्रेनिंग कॉलेज सुरू झाल्यास नक्कीच मोठ्याप्रमाणावर प्रशिक्षित शिक्षिका बाहेर पडून स्त्री शिक्षणासाठी जास्तीत जास्त गती येईल हे निदर्शनास आणून दिले. पुढील कालखंडामध्ये अखिल भारतीय महिला परिषदेच्या वतीने दिल्ली येथे लेडी आयर्विन कॉलेज ऑफ होम सायन्स स्थापना करण्यात आले , हे कुठेतरी महाराणी चिमणाबाई द्वितीय यांच्या त्या वेळी भाषणात व्यक्त केलेल्या अपेक्षेचे फलित स्वरूप होते असेच म्हणावे लागेल. आपल्या भाषणामध्ये महाराणीने स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाचे विचार मांडले. त्यानुसार त्यांना उद्योग व्यवसाय यामध्ये सहभागी होता येईल असे शिक्षण देण्याबद्दलची आपली आग्रही भूमिका मांडली. त्याचबरोबर देशाच्या विकासात स्त्रियांच्या सहभागाचे आवश्यकता व्यक्त केली . कुटुंबातील मिळकतीमध्ये स्त्रियांना देखील योग्य तो हिस्सा मिळाला पाहिजे अशी आग्रही भूमिका मांडली. पतीच्या निधनानंतर अन्न आणि वस्त्र यासाठी देखील महाग होणाऱ्या स्त्रियांची अवस्था व्यक्त करून, त्यासाठी पतीच्या मिळकतीमध्ये स्त्रीला आवश्यक तो वाटा मिळण्यासाठी कायदेशीर तरतूद व्हावी अशी मागणी केली. त्यासाठी अखिल भारतीय महिला परिषदेने कार्य करावे, तशी मागणी करावी व त्याच्या पूर्व तयारीकरिता एखादी कमिटी नेमावी असा अत्यंत महत्वाचा सल्लाही महाराणी चिमणाबाई यांनी दिला होता .

आपल्या भाषणाच्या अंतिम टप्प्यामध्ये महाराणी चिमणाबाई दितीय यांनी एका अतिशय महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष वेधले ते म्हणजे भारतातील तत्कालीन कालखंडातील निरनिराळ्या संस्थानातील राण्या आणि महाराण्या यांनी भारतीय स्त्री सुधारणा चळवळीमध्ये योगदान देण्यासाठी पुढे यावे व आपल्या भारतीय भगिनींसाठी त्यांच्या शिक्षणासाठी व त्यांचे एकूणच जीवन सुधारण्यासाठी कार्य करावे असे जाहीर आव्हान केले. त्यासाठी मुंबईच्या एका वर्तमानपत्रात एका अनामिक स्त्रीने मांडलेली आपली करून कथा उदाहरणार्थ सांगितले.

**भारतीय परिप्रेक्ष्यात स्त्रियांच्या शिक्षणाबाबत महाराणींचे विचार :**

महाराणी चिमणाबाई द्वितीय यांनी पाश्चात्य देशांमधील स्त्री चळवळ , तिची सामाजिक आणि वैचारिक पार्श्वभूमी याबाबत आपल्या प्रवासाच्या आणि युरोपातील वेगवेगळ्या देशांतील वास्तव्याच्या काळात अगदी जवळून अनुभव घेतलेला होता त्या आणि त्याच्याच आधारे त्यांनी भारतीय स्त्रियांच्या बाबत , त्यांच्या शिक्षण आणि स्वातंत्र्या बाबत आपली मते मांडली होती. पाश्चात्य देशातील स्त्री चळवळीचे अंधानुकरण करून उपयोगाचे नाही कारण भारतीय समाज आणि येथील पितृसत्तेचे स्वरूप हे पाश्चात्य देशांपेक्षा भिन्न आहे हे त्यांनी स्पष्ट केले होते. राजपुत्र फतेसिंहराव यांच्या विवाहप्रसंगी आयोजित एका सामाजिक कार्यक्रमाच्या वेळी भाषण करताना महाराणी चिमणाबाई म्हणाल्या होत्या की, "प्रिय भगिनींनो , आज भाषण करण्याचा माझा पूर्वी बेत नव्हता; पण कार्यक्रमातील सर्व कामे पाहून आयत्या वेळी बोलण्याची एकदम स्फूर्ती झाली. आज हा आनंदाचा प्रसंग आम्हाला लाभला याचे श्रेय मिस भोर व मंडळीस आहे. मिस भोर सारखे लोकं आमच्या राज्यात आहेत याचे आम्हास मोठे भूषण आहे स्त्री जातीची प्रगती होत जावी , ही माझी सतत इच्छा असल्यामुळे आजच्या प्रसंगी दिसलेल्या सर्व गोष्टीमुळे मला संतोष झाला आहे. तसेच आजच्या समारंभात आमची काही मोठमोठी पाहुणे मंडळी आहेत याचाही मला आनंद होत आहे. त्यांचे मी आभार मानते. आता मी चार शब्द

बोलणार आहे त्यामुळे कोणास आपला उपमर्द झाला असे वाटू नये, माझ्या मनातून जे काही बोलवयाचे आहे , ते मी उघडपणे बोलते"[१५] महाराणी साहेबांच्या या वक्तव्यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की त्यांना स्त्रियांच्या सुधारणेच्या प्रत्येक कामाबाबत प्रचंड तळमळ होती त्याचबरोबर त्या स्पष्टवक्त्या होत्या कुणाला आपले बोलणे पटले नाही तरीही चालेल पण स्त्रियांच्या प्रगतीसाठी योग्य ती भूमिका घेणे आणि ती जाहीरपणे मांडणे त्यांना योग्य वाटत असे. महाराणी चिमणाबई द्वितीय यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला होता , त्यासाठी त्यांनी संपूर्ण हायतभर कार्य केले; मात्र शिक्षणाचा खरा अर्थ समजून न घेणाऱ्या व स्वतःला खूप ज्ञानी समजणाऱ्या स्त्रियांना देखील त्यांनी खडे बोल सुनावले होते. स्त्रियांच्या चुकीच्या वागण्याबद्दल वेळप्रसंगी त्यांनी स्त्रियांना सुद्धा धारेवर धरण्यास मागेपुढे पाहिले नाही. स्त्रियांची कर्तव्ये कोणती असली पाहिजे , याविषयी मिस भोर यांच्याशी माझे अनेक वेळा बोलणे झाले आहे. हल्ली असे दिसते की, थोडेसे शिक्षण मिळाले की, त्याना आपण फार विद्वान आहोत असे वाटते. खरी शिकलेली माणसे असतात ती नम्र असून विचारी असतात. अर्धवट शिकलेली माणसे विचार न करता दुसर्यांचे अनुकरण करतात. कित्येकांचे तर इंग्रजी पोशाख म्हणजे बूट इत्यादीकांवाचून तर चालेनासेच होते. आजकाल त्याला पोलका म्हणतात तो स्त्रियांनी घालावायची चाल पडली आहे.तो आम्हास शोभत नाही आणि सोयीचाही नाही. पोलका घालावयाचा तो गरज असतानाच घालावा. उगीच लोकं घालतात म्हणून घालू नये. आपल्या देशाची हवापाणी, राहणी व आपली स्थिती यास अनुसरूनच आपल्या पोशाखाची योजना केलेली आहे. तोच आपल्याल शोभणारा व सोयीस्कर आहे. शिवाय पुष्कळांची ऐपत बेताबेताचीच असल्याकारणाने हा रिकामा खर्चाचा बोजाच होऊन बसतो. असे असूनही बायकात ही चाल वाढत चालली आहे. यात काही स्त्रियांचाच दोष आहे असे नाही त्यांना बरे वाईट दाखविण्याचे काम ज्यांचे आहे , त्या पुरूषांदेखील , चांगले वाईट कोणते हे पुरेसे कळत नसते. त्यामुळे असे होते."[१६]

महाराजांच्या स्त्रियांच्या शिक्षणाच्या आणि सुधारणेच्या कार्याची आठवण करून देतांना महाराणी स्त्रीयांन सांगतात की, "आपला देश , आपली स्थिती, मुलाबाळांविषयी आपली कर्तव्ये याविषयी काही स्त्रियांच्या भलभलत्या कल्पना असतात . हा सारा अर्धवट शिक्षणाचा आणि अविचारीपाणाचा परिणाम आहे. माझी आपणास अशी सूचना आहे की, श्रीमंत महाराज साहेब यांस आपल्या प्रजाजानंची जी कळकळ आहे , जिच्यामुळे ते एवढे श्रम घेतात . त्याचे खरे चीज स्त्रियांनी केले पाहिजे , स्त्रियांचे विचार सुधारले पाहिजे. ते असे की आपली स्थिती आणि आपल्या देशाची अवस्था व ती कशी सुधावी इत्यादी गोष्टी मनात आणून त्यांनी नेहमी आपल्या हितास जपले पाहिजे."[१७]

**महाराणी चिमणाबाई यांची स्त्री-पुरुष समतेची भूमिका :**

तत्कालीन समाजातील पुरुषसत्तेच्या स्वरूपाची देखील महाराणींना चांगलीच जाणीव होती. समाजतील पुरुषांची स्त्रीविषयक दुय्म भूमिका त्यांना आजिबात मान्य नव्हती. इतकेच काय त्यांना स्वतःला देखील असे दुय्यामत्व आजीबात मान्य नव्हते . समानतेच्या तत्वावर आपल्यालाही महाराजांइतकेच अंगरक्षक मिळावे या त्यांनी केलेल्या मागणीवरून हे दिसून येते. "समारंभाच्या मानसन्मानप्रसंगी महाराजांना मिळणाऱ्या अंगरक्षकांइतकेच अंगरक्षक, समानतेच्या तत्वावर आपल्याला मिळाले पाहिजे अशी मागणी महाराणी चिमनाबाई द्वितीय यांनी केली होती. सैनिक मानसन्मानाच्या संदर्भातील त्यांची मागणी दरबार समारंभ प्रसंगापुरतीच मर्यादित नव्हती. सैनिकी खात्याच्या कवायती फौजेच्या संदर्भात सेक्शन ९५ या नियमांतर्गत राजघराण्यातील व्यक्ती व इतर काहींच्या बाबत त्यांच्या त्यांच्या श्रेणीनुसार अंग रक्षकांच्या संख्येबाबत नेमके विधान करण्यात आलेले होये. हर हायनेस व युवराज यांना ३२ स्वाऱ्यांचा मान होता;म्हणजे महाराजांपेक्षा कमी. हर हायनेस यांना जाणून घ्यायचे होते की कशाच्या आधारावर ही संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. सैनिकी खात्याकडे या संबंधात विचारणा करण्यात आली तेव्हा त्यांना असे कळविण्यात आले की , इ.स. १९०४ ला खात्याने एक तीपण सादर केले होते. व त्यात म्हातले होते की , हर हायनेस आणि युवराज यांना ३२ स्वाऱ्या असाव्यात . आणि त्यांच्या या प्रस्तावाला त्यावेळच्या दिवाणसाहेबांकडून मंजुरी मिळाली होती. महाराजांच्या आदेशानुसार प्रकाशित झालेल्या कवायती नियमात हीच संख्या कायम ठेवण्यात आली होती. त्तरीही हर हायनेस यांची अशी इच्छा होती की त्यांनाही हिज हायनेस यांच्या इतकेच , समारंभ प्रसंगी संख्येने समान असतील असे अंगरक्षक देण्यात यावेत. परंतु त्यांची ही मागणी अमान्य करण्यात आली. इथे आपल्याला महाराणींचा लिंगाधारित समानतेचा आग्रह स्पष्ट दिसतो."[१८]

कलकत्ता येथे १९०६ मध्ये आखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते . त्याला जोडून महिलांची परिषद भरली होते त्याचे अध्यक्षपद महाराणी चिमणाबाई यांना देण्यात आले होते. आपल्या भाषणातून त्यांनी स्त्रियांशी साधलेला संवाद , त्यांच्या वैचारिक कार्याची साक्ष देणारा आहे. "Beloved sisters- you have done me great honour by asking me to to recite at this ladies conference. When the Mahila samiti sent me an invitation to Baroda to preside at this meeting my first idea was to decline the honour, as I know that there are many among you who are better qualified to preside than me. But I felt that it was an act of kindness on your part to have sent me this invitation to the other end of India, and that would be a poor response to your kindness if I refused your reques. Therefore, dear sisters of Bengal, I have been persuaded to accept your invitation. And if I fail to discharge my duties with the ability which, I know many of your possess, I must ask you for your indulgence, as you are yourself responsible for electing me your president!

And first let me tell you and happy I feel to find myself once more among you. I have lately travelled much in distant lands in France and England, Italy and Greece, Germany and Austria, Switzerland and America, and I have been much interested in the arts and industries, and the social and educational institution that I have seen. But I come with different feelings to you, I come as a returned wanderer, as an exile taken back in his home again. For there is a bond of union which unites us and makes us all India for our home.

You received me kindly and lovingly , two years ago; and I feel myself as much at home in Bengal as at Baroda, among sisters engaged in the same work and endeavours, Daughters of the same beloved motherland.

Your Mahila samiti cherishes these sentiments. One of its principal object is to unite Indian ladies of all creeds, cast and reces. Our men are drawing closer together, year after year by means of Congress, and various conferences and through common aims, aspirations and endeavours, but I think in cementing the bonds of national union, we women of India, have an influence not less potent than that of men. We meet each other in our homes, we learn to know and respect and love it other within the walls of zenana and we strengthen those ties with hold together a nation. For, although we may leave thousands miles apart and although we may speak different languages, we are united by a bond of common sentiments and common endeavours. High or low rich or poor, we are all proud of same tradition of the past inspired by the same aspirations for the future, united by the same sentiments of affection and of love. It is a happy idea, therefore which has lead the Mahila samiti to try and bring together ladies from all parts of India ; then more we meet, the more we know each other, the better shall we succeed in our common work and endeavours.

Another object of Mahila samiti is to spread on knowledge of Indian literature and history; and in this respect also I think we women have a degree of influence perhaps more far- reaching than that of men. We shape the minds of our children in their infancy and boyhood.We can inspire them with love and a legitimate pride in our past history, and we can create in them a test for our modern literatures. I believe there are gifted ladies in this advanced province who have written works which will live in the literature of the land. But all of us- who are without such high gift have the power to train our children in a love of their own history and literature; and believe me the teaching of the nursery have a more lasting and durable influence through life then it is generally supposed. The manhood and the womanhood of India is our handwork; let us, mothers, train the future manhood and womenhood of India to the service of our country.

Lastly to encourage the arts and industries of India is also one of the objects of the Mahila samiti and I believe to this conference. I know how the ladies of Bengal have helped and supported the Swadeshi movement, which is now spreading fast over Northern India and the Punjab, over Gujarat and the Deccan, over Madras, Mysore and Travancore everywhere over this great continent.

From all parts of India we have watched with the wondering admiration this great moment which you have boldly started and nobally sustained, Until all India Today is uniting in this great and patriotic endeavour. Indian stores are growing up, almost spontaneously, in every province; mills are increasing in number in the great industrial towns of Western India; handlooms have more than doubled in Bengal within the last two years; the use of Indian metalware and other articles of domestic use is rapidly extending. I am told that thousands of weavers and workers in metal , who had lost their locations are returning to the looms and there anivils. and that is many a village home, our poor sisters, the mothers and wives and daughters of artisans are feeling now hope and a new inscitemens to work. History, if it is a record of national progresss, will record the wonderful tale of this great moment,- so recent, already so successful and which the entire nation is so resolved to make durable and lasting. Let us women of India, joined whole heartedly in this moment and in the selection of articles for our daily and domestic use, in the purchase of dress and ornaments for ourselves and our children, let us remember the claims of those tens of millions of our Indian weavers and artisans who suffering and poverty we have the power to remove.

wherever we may dwell in this vast country, whatever be our religious creed and profession in life, let us all unite in the common aim and endeavour to advance the progress and the prosperity of our country.

A New light is breaking on India with the commencement of a new century. Let us all pray to that great being who can help the poor, and raised the Lowly, that it may be the down of a long bright day for our beloved Motherland." [19]

महाराणींच्या वरील भाषणातून त्यांची समस्त भारतीय स्त्रियांच्या सुधारणे बद्दलची तळमळ जशी दिसून येते तशीच त्यांचा भारतातील स्त्रियांच्या क्षमतेवरचा प्रगाढ विश्वास देखील दिसून येतो.

**महाराणी चिमणाबाई यांचे पुरुषसत्तेबद्दल विचार:**

महाराणी चिमणाबाई यांनी स्त्रीस्वातंत्र्याचा विचार मांडत असतांना तत्कालीन समाजातील कठोर पुरुषसत्ता, पुरुषांचे स्त्रियांवरचे अत्याचार , व्यसनाधीनता अशा अनेक बाबींवर कडाडून प्रहार केला होता. आपल्या भाषणात त्या म्हणतात की, " पुरुषांच्या आचरणात सुद्धा फार अविवेकीपणा दिसून येतो . इंग्रजी व्यास्नेम्ह्न्जे चिरूट ओढणे, इंग्रजी कपड्यांची हौस आपल्या देशाची अनास्था, आपल्या लोकांचा कंटाळा इत्यादी तरुण पुरुषांच्या समजुती अगदी गैर होत. खरी सुधारणा म्हणजे काय व कोणत्या दिशेने झाली पाहिजे हे चांगल्या ग्रज्युएटाना सुद्धा कळत नाही असे दिसते. नुसते इंग्रजी पद्धतीचे कपडे घातल्याने, म्हणजे पोषाख बदलल्याने आपण त्यांच्यासारखे थोर होऊ असे नाही . किंवा पोशाखात काही सुधारणा येऊन राहिलेली नाही. खरी सुधारणा म्हंटली तर आपल्या देशाचे व लीकांचे खरे हित कशात आहे ते ओळखून करण्याच्या मार्गास लागणे होय. आताशा पहावे तो पुरुषांनी पुष्कळ चमत्कारिक चाली उचलल्या आहेत. चांगल्या रीतीभाती म्हणजे काय हे त्यांना कळत नसते. तहान लागली की सोडा वाटर हवे, जणू काही पाण्याला अगदी तोदाच पडला आहे. ते पिणे म्हणजे आपल्या थोर्वीस कमीपणा येतो असे पुष्कळांना वाटते. "[१९]

**The Position of women in Indian Life – Maharani Chimnabai II**:

महाराणी चिमणाबाई द्वितीय यांचे भारतीय स्त्रीचळवळीतील वैचारिक योगदान अत्यंत महत्वाचे आहे; मात्र भारतीय स्त्रीवादी अभ्यासक यांनी त्याची फारशी दाखल घेतलेली दिसून येत नाही . महाराणी चिमणाबाई यांनी The Position of women in ndian Life हा भारतीय स्त्रियांच्या जीवनावर सर्वांगीण प्रकाश टाकणारा अत्यंत महत्वाचा ग्रंथ १९११ मध्ये त्यांनी लिहिला होता. एस. एम. मित्रा यांनी त्याचा इंग्रजी अनुवाद केला. भारतीय स्त्रियांची स्थिती आणि ती बदलण्यासाठी करावयाच्या उपाय योजना यांचा सविस्तर लेखाजोखा त्या पुस्तकातून महाराणींनी घेतला आहे. त्या म्हणतात "wondered whether I could do anything to awaken my Indian sisters from their lethargy of ages, to enable them to take their proper place in Indian public life. I therefore tried to lern what I could from the Western system- British, Continental and American-which came under my observation , feeling strongly that I owed it to my sisters in India to give them the benefit of the impression gatherd during my travelson matters particularly affecting the position of women." [20] पुस्तकाच्या अगदी प्रारंभीच त्या सांगतात की युरोप आणि अमेरिकेला भेटी दिल्यांनतर तेथील स्त्रियांची परिस्थिती आणि आपल्या भारतीय स्त्रियांची परिस्थिती यांमधी प्रचंड तफावत पाहून मी अक्षरशः चक्रावून गेले होते. पाश्चात्य आणि भारतीय स्त्रियांचा मानवी कल्याण संस्थांमधील सहभाग, तेथील स्त्री आणि पुरुष यांच्यातील सहकार्य ; जे भारतीयांना पूर्णतः अपरिचित होते. तेथील ज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती . हे भारतात का अस्तित्वात नसेल? भारतीय स्त्रियांनी आणखी किती काळ असे एकाकी आणि बंदिस्त जीवन जगावे अशा अनेक प्रश्नांचे मोहळ महाराणींच्या मनात उठले होते. त्या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात त्यांनी भारतीय स्त्रियांच्या परिस्थितीचा जास्तीत जास्त अभ्यास , मनन , चिंतन केले आणि त्याचीच परिणती म्हणजे त्यांचे हे अतिशय सुंदर असे पुस्तक आहे. पहिल्याच प्रकरणामध्ये त्यांनी स्त्रियांच्या चळवळीचा, भारत आणि जागतिक परिप्रेक्ष्यात सखोल आढावा घेतला. त्यानंतर स्त्रियांचे अर्थव्यवस्थेतील स्थान स्पष्ट करत स्त्रिया आणि व्यवसाय यांची चर्चा केली. कृषीव्यवस्था त्यातील स्त्रियांचा सहभाग, गृहउद्योगातील स्त्रियांचा सहभाग , कला आणि हस्तकला यातील नवनव्या संधी याविषयी त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आढावा घेतला. हे करत असताना त्यांनी जगभरातील अनेक देशांमधील स्त्रियांच्या यशस्वी उद्योगांची उदाहरणे देखील सांगितली. स्त्रियांच्या समोरील बौद्धिक आव्हाने कोणकोणती आहेत याची त्यांनी एका प्रकरणात सविस्तरपणे मांडणी केली . त्यांची ही मांडणी भारतीय स्त्री चळवळीत कार्य करणाऱ्या प्रत्येक स्त्रीने खरे तर मुळापासून वाचणे आणि समजून घेणे आवश्यक होते मात्र; सत्तरच्या दशकातील भारतीय स्त्रीवादी अभ्यासक पाश्चात्य देशातील स्त्रीवादी सिद्धांत आणि स्त्रीवादी विचारवंत यांच्या अभ्यासात इतक्या गढून गेलेल्या होत्या की त्यांना महाराणी चिमणाबाई , एक भारतीय विचारवंत स्त्री जे विचार मांडत होत्या त्यांची योग्य आणि पुरेशी दखल घेण्यास दुर्दैवाने सवड मिळाली नाही! विविध परोपकारी कामे, गृहविज्ञान, महिला इन्स्पेक्टर , अधीक्षिका, युरोपातील सहकारी चळवळ, सेवाभावी संस्था आणि त्यांचे कार्य अशा अनेकविध विषयांवर महाराणी चिमणाबाई यांनी अतिशय सखोल प्रकाश टाकला आहे. ह्या पुस्तकाची मांडणी करतांना त्यांनी भारतीय स्त्री आणि पाश्चात्य स्त्री यांच्या जगण्यातील तफावत उदाहरणांच्या सहाय्याने दाखवून दिलेली आहे. त्यामुळेच महाराणींनी लिहिलेले हे पुस्तक तत्कालीन भारतीय स्त्रियांच्या वास्तव जीवनाचे खरे चित्र दाखविणारे महत्वाचे साधन ठरते.

महाराणी चिमणाबाई या त्या कालखंडात अगदी निडरपणे स्त्रियांच्या हक्काच्या बाजूने ठामपणे उभ्या राहिल्या. महाराज सयाजीराव गायकवाड हे आपल्या पत्नीच्या प्रत्येक कार्यामागे खंबीरपणे उभे राहिले आणि प्रत्येक पावलावर त्यांना साठ दिली. म्हणूनच महाराणी साहेब स्त्रियांच्यासाठी भरीव कार्य करू शकल्या.

संदर्भ :

१. हिंगुराव मंदा, महाराजा सयाजीराव आणि स्त्रीशिक्षण , साकेत प्रकाशन , औरंगाबाद, २०१५, पृ. १५७
२.आपटे दाजी, श्री महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे यांचे चरित्र, पृ. ३२०
3. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
4. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
5. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
6. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
7. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
8. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
9. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
10. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
11. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
12. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
13. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
14. Maharani Chimanabai II, Presidential Address of All India Women's Conference , Pune , 1927
15. श्रीमंत सौ.महाराणी चिमणाबाई गायकवाड द्वितीय यांचे भाषण, बडोदा. महाराज सयाजीराव गायकवाड चरित्र संग्रह भाग १
16. श्रीमंत सौ.महाराणी चिमणाबाई गायकवाड द्वितीय यांचे भाषण, बडोदा. महाराज सयाजीराव गायकवाड चरित्र संग्रह भाग १
१७. श्रीमंत सौ.महाराणी चिमणाबाई गायकवाड द्वितीय यांचे भाषण, बडोदा. महाराज सयाजीराव गायकवाड चरित्र संग्रह भाग १
18. हिंगुराव मंदा, महाराजा सयाजीराव आणि स्त्रीशिक्षण , साकेत प्रकाशन , औरंगाबाद, २०१५, पृ. १६२
19. The Ladies' Conference , Presidential Speech of Her Highness Maharani of Baroda, 1906, Culcutta
20. Maharani Chimnabai II, The Position of women in Indian Life, 1911.